ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# विदर्भ नावाच्या निर्मितीच्या घटनाक्रमाचा इतिहास

**प्रा.डॉ. निलय देशमुख**
**महात्मा ज्योतीबा फुले, वाणिज्य विज्ञान व विठ्ठलराव राऊत महाविद्यालय, भातकुली, जि. अमरावती.**



वऱ्हाड प्रांताला 'विदर्भ' या नावाने संबोधायचे का हा आजही वादाचा विषय आहे. परंतु प्राचीन भारताच्या इतिहासात वेदात 'विदर्भाचा' उल्लेख आढळतो. परंतु मध्यकाळात भारताच्या इतिहासात 'बेरार' नावाचा नामोल्लेख होऊन 'वऱ्हाड' हा शब्द प्रचलीत आला आणि तोच पुढे प्रचलीत राहीला.विदर्भात यादव वंशातील भोज राजे वरदा नदीच्या तिरावर कुंडीनपूर येथे राज्य करीत होते. नलचंपू कर्त्या त्रिविक्रमभटाने तर 'वरहतट' हे प्राचीन विदर्भाचे नाव नमूद केले आहे तो म्हणतो.

वीर पुरुष तदेतव्दरक्षात नामक महाराष्ट्रम
दक्षिण सरस्वती सा वहति विदर्भा नदी यत्रा।।

'वरदातट' शब्दानेच या प्रदेशाचे नाव 'विदर्भ' असे होऊन प्रचलित आले. याच प्रदेशात 'वऱ्हाड' असाही शब्दप्रयोग केला जातो. वऱ्हाड हा शब्द कसा प्रचलित आला याविषयी अबुल फजल यांनी आईन-ए-अकबरी मध्ये वर्धा (नदीचे नाव) व तट (किनारा) यापासून आला आहे. असे मानतो. महाभारत पुराणे इत्यादी उत्तरकालीन ग्रंथात विदर्भाचा उल्लेख अनेक ठिकाणी येतो. पयोष्णी (पुर्णा), वरदा (वर्धा), वेणा (वाईनगंगा ) इत्यादी पुण्यनद्यांचा व त्यांच्या तिरावरील पुण्यक्षेत्राचा उल्लेख उपरोक्त ग्रंथात येतो.[१]

विदर्भाचा ऐतिहासिक कालखंड २५०० वर्षाचा असुन या काळात विदर्भावर राज्य करणाऱ्या प्रसिध्द राजघराण्यामध्ये मौर्य, सातवाहन, वाकाटक, कलचुरी , राष्ट्रकुट चालुक्य, यादव या सर्व राज्यांचा उल्लेख 'विदर्भ' या नावाने होतो. याचाच अर्थ प्राचीन भारताच्या इतिहासात 'विदर्भ' या नावाचा उल्लेख होतो. परंतु मध्यकाळात 'बेरार' च्या निर्मीतीपासुन वऱ्हाड ची निर्मीती झाली. आणि ते भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत वऱ्हाड हा स्वतंत्र प्रांत अस्तित्वात होता. त्यावेळी विदर्भ राज्याचा उदय झाला नव्हता. विदर्भ राज्य कसे अस्तित्वात आले यावर संशोधनातुन प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करीत आहोत.

मध्यकाळात इ.स. १३१८ ते ते १३४६ या काळात दिल्लीवर खिलजी व तघलक या घराण्याचे राज्य वऱ्हाडात होते. इ. स. १३४६ मध्ये दिल्ली सुलतान महमद तहालकाच्या काळात दक्षिणेकडे बंड झाले असतांना त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सुलतानाने हसनगंगु व हरीहर बुक यांना दक्षिणेत पाठवीले. हसनगंगुने दक्षिणेतील बंडाळी मोडुन गुलबर्गा येथे बहामणी राज्य व विजयनगर येथे हरीहर, बुक्क या बधुंनी हिंदु राज्याची निर्मिती केली.

बहामनी सुलतांनांनी पश्चिम विदर्भाला 'बेरार' ही संज्ञा देऊन सरदारांमार्फत इ. स. १३४६ ते १४८४ पर्यंत विदर्भावर राज्य केले. पुढे १५ व्या शतकाच्या उत्तरर्धात बहामनी राज्याचे सरदार स्वतंत्र होऊन बहामनी राज्याचे पाच तुकड्यामध्ये रुपांतर झाले.

इ. स. १४८७ मध्ये वझीर इमाद उल मुल्क याने अमरावती जवळील अचलपूर येथे राजधानी स्थापन करुन इमादशाहीची निर्मिती केली. इ. स. १५६२ पर्यंत वऱ्हाडप्रांतावर त्याचे शासन होते. त्यानंतर अहमदनगरच्या मूर्तीजा निजामशहाने वऱ्हाड जिंकून आपल्या राज्याला जोडला. अशा प्रकारे इ. स. १५६२ मध्ये इमादशाहीचा अंत होऊन निजामशहीला सुरुवात झाली. इ. स. १५६२ ते इ. स. १५९५ पर्यंत वऱ्हाडवर अहमदनगरच्या सुलतानाचे शासन होते. पुढे मोगल सम्राट अकबराने दक्षिण जिंकण्यासाठी इ.स. १५९५ मध्ये निजामशाहीवर आक्रमण केले. निजामशाही तर्फे चांदबीबीने शहजादा मुरादबरोबर तह करुन वऱ्हाड मोगलाच्या स्वाधीन केला. अशाप्रकारे इ.स. १५९५ मध्ये वऱ्हाडामधील

खानदेश व बिदरवर मोगल सत्ता सुरु झाली. इ. स. १६०१ मध्ये बादशाहा अकबराने वऱ्हाड हा स्वतंत्र मोगली सुभा बनविला. मोगल सम्राट शहाजहॉनने इ.स. १६३६ मध्ये निजामशाही बुडवीली. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली असली तरी वऱ्हाडचा प्रदेश त्यांच्या राज्यांत समाविष्ट नव्हता. शिवाजीने वऱ्हाडप्रांतातुन लुट व चौथाई वसूल केली असली तरी वऱ्हाड मागेली आधिपत्याखाली एक सुभा होता. शिवाजी महाराजांच्या मृत्यू नंतर औरंगजेबाने दक्षिणेवर आक्रमण करुन विजापूरची आदिलशाही व गोवळकोंडाची कुतुबशाही इं.स. १६८९-९० मध्ये जिंकून घेतली. त्यानंतर दक्षिणेतील पूर्वविजीत प्रदेश खानदेश, बेरार, बिदर, अहमदनगर व नवविजीत प्रदेश विजापूर, गोवळकोंडा अशा सहा सुभ्यात विभागला औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (इ.स. १७०७) दिल्लीत वारसा युध्दाला तोंड लागले. शाहू महाराजांच्या सुटकेनंतर साताऱ्याला मराठ्यांचे राज्य स्थापन झाले. छत्रपती शाहूच्या काळात पेशवाईला सुरुवात झाली. पेशवाईच्या उदयामुळे मराठा सरदारांच्या बलाढ्य संघाची निर्मिती झाली. दिल्लीतील राजकीय उलथापालथीमुळे व दक्षिणेतील मोगलांची स्थिती कमकुवत बनली.[२]

छत्रपती शाहूच्या काळात मराठ्यांना मोगलाकडून दक्षिणेतील सहा सुभ्यामधुन चौथाई सरदेशमुखी वसुलीचे अधिकार मिळाल्यानंतर शाहूने वऱ्हाडातील चौथाई वसुलीसाठी परसोजी भोसले या सरदारास नेमले होते. इ. स. १७२४ मध्ये मोगल बंडखोर सरदास निजाम उल मुल्क दक्षिणेत येऊन त्याने हैद्राबादला स्वतंत्र निजामी शासन प्रस्थापीत केले. त्यामुळे दक्षिणेतील सहा सुभ्याच्या चौथाई वसुलीचा मराठा अधिकारावरुन मराठा-निजाम संघर्षाला सुरुवात झाली.मराठ्यांमध्ये अंतर्गत कलह असल्यामुळे परसोजीचा मुलगा कान्होजी भोसले यांच्यात वितृष्ट निर्माण झाले. शाहूने इ. स. १७२८ मध्ये कान्होजीच्या बंदोबस्तासाठी साताऱ्याहुन रघुजी भोसल्यास पाठविले. रघुजीने सैनिकांच्या सह्याने संपूर्ण वऱ्हाडातून खंडण्या वसुल करुन अमरावतीला आला. उमरावतीकर राणोजी भोसल्यांच्या मदतीने रघुजीने माहुर निकट कान्होजीला पराभूत करुन कैद केले व साताऱ्यास पाठवून दिले. रघुजीला याच दरम्यान सोनासाहेब सूभा हा किताब व वऱ्हाड प्रांताच्या चौथाई वसुलीचे पूर्ण अधिकार प्राप्त झाले . हैद्राबादला निजाम वऱ्हाड प्रांतात रघुजी भोसले स्थिर झाल्यानंतर चौथाई सरदेशमुखीच्या वसुली प्रकरणावरुन त्यांच्या वितृष्ट निर्माण झाले. त्यावर तोडजोड म्हणुन भोसल्यांनी चौथाई सरदेशमुखीचा वाटा ६० टक्के व निजामाने ४० टक्के ठेवावा असे ठरले. तडजोड म्हणुन वसुलीसाठी पुर्व वऱ्हाड भोसल्यांकडे व पश्चिम वऱ्हाड निजामाकडे वाटून देण्यात आला. यालाच वऱ्हाडवरील दुअमलीशासन म्हटल्या जाते. इ. स. १७३४ मध्ये रघुजी भोसले यांनी गोंड राज्याच्या अंतर्गत भांडणात हस्तक्षेप करुन नागपूर येथे राजधानी निर्माण केली. रघुजी भोसल्यांचा स्वतंत्र शासन म्हणुन उदय झाला. गाविलगड व नरनाळ हे अभेद्य किल्ले भोसल्यांच्या ताब्यात होते. तरी सुध्दा ब्रिटिशांनी मात्र नेहमीच निजामास वऱ्हाड प्रातांच्या राजा संबोधिले आहे. एकीकडे दक्षिणेतील निजामाचे राजकीय वर्चस्व आणि दुसरीकडे भोसल्यांचा आर्थिक अधिकार अशा दुहेरी राजवटी खाली वऱ्हाडचा भाग होता. त्यामुळे वऱ्हाडात दुअमली शासनाला सुरुवात झाली. निजाम व मराठे यांच्या शासनाखाली वऱ्हाडातील प्रजेवर कमी-अधिक प्रमाणात सारखेच अन्याय झालेत. प्रजेमध्ये असुरक्षितता निर्माण झाली. नागपूरच्या भोसलेच्या सत्तेचा जोर इ.स. १७५१ मध्ये वऱ्हाडात विशेष असावा असे दिसते. पानीपतवरील दारुन पराभवानंतर दक्षिणेत निजामाने मराठ्याविरुध्द आक्रमक मोहीम उभारली.

जानोजी सुध्दा निजामास मिळाला. म्हणुन जानोजीला धडा शिकविण्यासाठी पेशवे माधवराव व रघुनाथराव वऱ्हाडात आले. पेशव्यांनी भोसल्यांच्या वऱ्हाडातील महालांवर जप्त्या बसविण्यासाठी आपली तीन-चार सैन्य पथके रवाना केली. पुढे जानोजीने पेशवा बरोबर दर्यापूरचा तह करुन काही प्रदेशावर पाणी सोडले. तरीही कल मिटला नाही. माधवरावाने भोसल्याविरुध्द पुन्हा दुसरी मोहिम हाती घेतली. यावेळी माधवराव पेशव्यांनी देवाजीपंत कैद करुन आपल्या लष्कराबरोबर ठेवले व मजल दरमजल कूच करीत पेशवे वऱ्हाडात शिरले. पेशव्यांच्या या भोसले विरोधी स्वारीने वऱ्हाड प्रांतात भोसल्यांचा अंमल उठवून आपला अमल कायम केला. जाने. १७६९ पर्यंत पेशव्याने वर्धा नदीच्या पश्चिमेकडील सर्व मुलुख आपल्या ताब्यात घेतला. अखेर कनकपुरच्या तहाने भोसले व पेशवे यांच्यातील हा संघर्ष काही काळ थांबला.[३]

मराठ्यांच्या भितीमुळे निजामाने पूर्वीच इंग्रजांची तैनाती फौज स्विकारली होती. पेशवा बाजीराव दुसऱ्याने इ.स. १८०२ मध्ये इंग्रजांचे संरक्षण घेतले. त्यावरुन मराठा इंग्रजांचे दुसरे युध्द सुरु झाले. भोसल्यांनी निजामाच्या राज्यात धुमाकुळ माजवल्यामुळे निजामाच्या राज्याचे रक्षण करण्यासाठी व भोसल्यांच्या बंदोबस्तासाठी इंग्रज अधिकारी वेलस्ली वऱ्हाड प्रांतावर चालुन आला. दिनांक २९ नोव्हे. १८०३ रोजी अकोला जिल्हयात अकोट तालुक्यातील अडगावच्या लढाईत भोसल्यांचा पराभव झाला. १६ डिसे. १८०३ रोजी देवगाव येथे वाटाघाटी होऊन तहावर सह्या झाल्या या तहानुसार वऱ्हाडप्रांतावर असलेली भोसल्याची वतनदारी काढुन टाकण्यात आली. या तहानुसार वर्धा नदीच्या पश्मिकडील वऱ्हाडचा सर्व प्रदेश (गावीलगड व नरनाळा हे दोन किल्ले व त्या खालचा प्रदेश वगळून) इंग्रजांना देण्यात आला. त्यामुळे भोसल्यांचा काही प्रमाणात वऱ्हाडशी संपर्क तुटला. या लढाईमध्ये इंग्रजांचा साक्षीदार निजाम होता. इंग्रज व निजाम यांच्यात पुढे दिनांक १८ एप्रिल १८०४ रोजी, झालेल्या वाटणीच्या तहानुसार इंग्रजांनी हा प्रदेश निजामाला देऊन टाकला. अशाप्रकारे वऱ्हाडप्रांतावर निजामाची निरंकुश सत्ता सुरु झाली. इ.स. १७१६ मध्ये भोसले इंग्रज यांच्यात तिसरे युध्द होऊन या लढाईत भोसल्यांचा पराभव झाला. दिनांक ६ जाने. १७१८ रोजी भोसले व इंग्रज यांच्यात झालेल्या तहानुसार तहानुसार वऱ्हाडचा शिल्लक राहिलेला प्रदेश भोसल्यांनी इंग्रजांना दिला. त्यामध्ये गाविलगड व नरनाळा हे किल्ले व त्या खालचा प्रदेश समाविष्ट होता. पुढे दिनांक १२ डिसे. १८२२ रोजी इंग्रजांनी वाटणीच्या तहानुसार हा प्रदेश निजामास दिला आणि इ.स. १८२२ च्या अखेरीपर्यंत संपूर्ण वऱ्हाड प्रांत निजामाच्या अधिपत्याखाली आला. इ.स. १८०४ ते १८५३ या कालखंडात वऱ्हाड प्रत्यक्षपणे निजामाच्या ताब्यात होता. या संदर्भात जुन १८०४ मध्ये तत्कालीन इंग्रज गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्लीने लिहिलेल्या एका पत्रातील

उतारा उद्‌बोधक ठरतो. लढाईत विविध प्रदेशावरील हक्क म्हणुन नोव्हेंबर मेहरबानी खातर देणगी म्हणून वऱ्हाड प्रांत निजामास देण्यात आल्याने गव्हर्नर जनरल वेलस्लीने म्हटले आहे.[४]

वऱ्हाडाला निजामाने मात्र अक्षरशः पिळले! वऱ्हाड प्रांतातील मलीक अंबरची रयतवारी पध्दती तोडून वऱ्हाड प्रतांच्या जमीन महसूल वुसलीचा मकता देण्याची पध्दत सुरु केली. एका निजामी राज्याचा सुभा म्हणून वऱ्हाड प्रांताचे शासन करीत असतांना वऱ्हाड प्रांताच्या महसूल वसुलीचा ठेका साधारणतः ५२ लाख रुपयात दिला जात असे. त्यामुळे वऱ्हाड प्रांताला 'बावन वऱ्हाड' असे म्हटले जात असे. निजाम तैनाती फौजेच्या जाळ्यात अडकल्यानंतर त्यांचे स्वतंत्र अस्तित्व संपले आणि तो इंग्रजांचा अधीन बनला. दिवसेंदिवस इंग्रजांचा प्रभाव वाढत गेला व आपला दिवान नेमतांना निजामाने इंग्रजांची संमती घेतली पाहिजे ही अट त्यांला स्विकारावी लागली.

निजामाच्या शासनकाळात वऱ्हाडची अर्थव्यवस्था डबघाईस आल्याने सैन्याचा पगार वेळेवर देऊ शकले नाही. त्यामुळे सैनिकांनी बंड केले. इंग्रजांनी मात्र त्याचा फायदा घेऊन निजामाची फौज इंग्रज अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली आणली. वारंवार कर्ज माजणारा निजाम व ते देण्यासाठी सदैव सज्ज असणारे इंग्रज असा प्रकार सुरु होता. इंग्रजांच्या मध्यस्थीने विल्यम पामर कंपनीकडून १६ टक्के व्याज दराने कर्ज घेऊन निजाम आपल्या राज्यकारभाराचा गाडा कसाबसा हाकीत होता. इंग्रज रेसिडेंट रसेल व त्यानंतर मेटकॉफ यांनी निजामाला सातत्याने कर्ज पुरवठा करवुन दिला. यानंतर इंग्रज स्वतः निजामाचे सावकार बनले. इंग्रजांनी वऱ्हाडचे भौगोलिक व आर्थिक महत्व हेरले होते. उत्तरेकील व दक्षिणेतील इंग्रज स्वामित्वाखालील प्रदेश एकसंघ करण्यास वऱ्हाड त्यांच्या नियंत्रणात असणे आवश्यक झाले होते. आर्थिकदृष्ट्या वऱ्हाड त्यांच्या नियंत्रणात असणे आवश्यक झाले होते. आर्थिक दृष्ट्या वऱ्हाड त्यांच्या नियंत्रणात असणे आवश्यक झाले होते. पेस्तनजीने सुरु केलेल्या कापसाच्या लागवडीचा अर्थ त्यांना उमगला होता. त्यामुळे निजामावर कर्जाचा डोंगर लावुन कर्ज फेडीसाठी त्याला हतबल बनिवण्याचा धुर्त डाव इंग्रजांनी रचला व कर्जफेडीसाठी निजामावर हळुहळु दबाव वाढतच गेला.

तैनाती फौजेच्या व्यवस्थेमुळे इंग्रज आणि निजाम यांच्यात नेहमीच खर्चाबाबत मतभेद होत असत. निजामावर इंग्रजांचे कर्ज दिवसेंदिवस वाढतच गेले. अखेर दिनांक २१ मे १८५३ रोजी इंग्रज व निजाम यांच्यात झालेल्या तहानुसार तैनाती फौजेचा पगार वेळेवर देता यावा यासाठी वऱ्हाडप्रांत निजामाने वहिवाटीसाठी इंग्रजांना दिला. त्या मोबदल्यात १५ लाख रुपये वार्षिक असा भाडेपट्टा ठरला होता. त्यानंतर वऱ्हाडप्रांतावर जरी निजामाचे सार्वभौमत्व असले तरी वऱ्हाड प्रांताच्या शासनाने सर्व अधिकार ब्रिटीश रेसिडेन्सीकडे होते. वऱ्हाड प्रांतांचे उत्तर वऱ्हाड व दक्षिण वऱ्हाड असे दोन जिल्हे होते. त्याचे मुख्य केंद्रस्थान बुलढाणा आणि हिंगोली होते.[५]

वऱ्हाड प्रांताचे शासन वहिवाटीसाठी इंग्रजांनी निजामाकडून आपल्या हाती घेतल्यानंतर इ.स. १८५३ पासुनच कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यात भर दिला होता. इ.स. १८५६ मध्ये झालेल्या इंग्रजाविरोधी पहिल्या स्वातंत्र्य संग्रामातील उठावाच्या वेळी निजामाने आपली इंग्रजनिष्ठा कायम ठेवल्यामुळे निजामाबद्दल इंग्रजांनी सहानुभूती अधिकच वाढली व निजामाला अग्रगण्य संस्थानिक असा किताब दिला. इ.स. १८५६ मध्ये इंग्रजांनी वऱ्हाड प्रांताच्या प्रदेशाची पुर्नरचना करुन पश्चिम वऱ्हाड व पूर्व वऱ्हाड असे दोन भाग निर्माण केले. यापैकी पूर्व वऱ्हाडचे मुख्यालय अमरावती तर पश्चिम वऱ्हाडचे मुख्यालय अकोला होते. वऱ्हाड प्रांताच्या विकासाचा हा पहिला टप्पा होय. अमरावती हे पूर्व वऱ्हाड प्रांतातील प्रमुख केंद्र असल्यामुळे इ.स. १८५३ मध्ये येथे डेप्युटी कमिशनरची नेमणुक करण्यात आली होती. त्यामुळे तिला एकप्रकारे वऱ्हाड प्रांताच्या राजधानीचा मान प्राप्त झाला.[६]

इ.स. १८६१ च्या डिसेंबरमध्ये इंग्रजांनी निजामाशी एक तह केला. या तहानुसार इंग्रजांनी निजामाचे ५० लाख रुपये कर्ज माफ केले. निजामाने सुध्दा वऱ्हाडप्रांताचा उत्पन्नाचा हिशेबाचा अधिकार सोडून दिला. सर्व वजा जाता राहिलेल्या उत्पन्नातुन इंग्रजांनी निजामास काही रक्कम देत रहावे असे ठरले. तसेच दक्षिण वऱ्हाड प्रांताचा काही प्रदेश (हिंगोली आणि आसपासचा प्रदेश) निजामाला मिळाला. अशाप्रकारे या तहाने वऱ्हाड प्रांताची हद्द कायम झाली. परंतु १६ वर्षापर्यंत निजामाला इंग्रजाकडून काहीही न मिळाल्यामुळे त्याचा दिवाण सालारगंग याने वऱ्हाड प्रांत परत मिळविण्यासाठी गर्व्हनर जनरलकडे वारंवार अर्ज केले. गव्हर्नर जनरलने भारत सचिवाला याबाबत विचारले असला वऱ्हाड प्रांताची जनता पुन्हा निजामी राज्यात जाण्यास तयार नाही. त्यामुळे केवळ आर्थिक बाजुचा विचार करुन चालणार नाही असे उत्तर दिले.

इ. स. १८५३ ते इ.स. १९०३ या ५८ वर्षाच्या काळात वऱ्हाड प्रांताचा कारभार सुव्यवस्थित चालविण्याच्या दृष्टीने ब्रिटिश प्रशासनाने वऱ्हाड प्रांताचे छोट्या छोट्या जिल्ह्यामध्ये विभाजन केले. इ.स. १८५६ मध्ये अमरावती आणि अकोला शहराला इंग्रजांनी जिल्ह्याचा दर्जा दिला. वर्णी जिल्हा इ.स. १८६४ मध्ये नव्याने बनविला गेला पुढे तो यतवमाळ झाला. मलकापूर, चिखली, मेहकर या तालुक्याचा नैऋत्य वऱ्हाड असा जिल्हा करुन मेहकर तालुक्यातील जानेफळ येथे जिह्याची मुख्य कचेरी ठेवण्यात आली होती. दुसऱ्या वर्षी त्याला मेहकर जिल्हा असे नाव दिल्या गेले. इ.स. १८६७मध्ये थंड हवेचे ठिकाण बुलडाणा कायम ठेवून त्याला बुलढाणा जिल्हा असे नाव दिले होते. याच दरम्यान एलिचपूरचा जिल्हा बनविल्या गेला. इ.स. १८६८ ला वाशिम जिल्ह्याची निर्मिती झाली परंतु नंतर तो अकोला जिल्हयात जोडल्या गेला. अशाप्रकारे अमरावती, एलिचपूर, वणी, अकोला, बुलडाणा, वाशिम असे सहा जिल्हे १९०३ पर्यंत वऱ्हाड मध्यप्रांतास जोडेपर्यंत अस्तित्वात होते.[७]

इ.स. १८८५ मध्ये ब्रिटीशांच्या विरोधात राष्ट्रीय जागृती करण्यासाठी ॲलन ह्युमच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झ ाली. इ.स. १९०२ मध्ये अहमदाबाद कॉंग्रेस अधिवेशात लार्ड कर्झनने निजामाला प्रतिवर्ष २५ लाख रु. देणे मान्य करुन वऱ्हाड प्रांत हा कायम स्वरुपात ब्रिटीश राज्याला जोडला. वऱ्हाड प्रांतावर निजामाचे स्वामीत्व आहे हे ब्रिटीश सरकारला मान्य होते. इ.स. १८५३ व १८६० च्या

तहानुसार ब्रिटीश सरकारचे वऱ्हाड प्रांताच्या राज्यव्यस्थेवर एकमुखी शासन कायम राहील. असे निजामाने मान्य केले होते. १ आक्टो. १९०३ रोजी वऱ्हाड प्रातांची राज्यव्यवस्था मध्यप्रातांच्या चीफ कमिशन साहेबाव्दारे होईल. असे लेखी घोषीत करण्यात आले. तात्पर्य, वऱ्हाडप्रात १ ऑक्टो. १९०३ पासून मध्य प्रांताला जोडण्यात आला. नवीन प्रांताचे नामविधान मध्यप्रांत आणि वऱ्हाड (Central Prouincess and Berar) असे करण्यात आले.

त्याची राजधानी नागपूर होती. दि. २२ एप्रिल १९०५ रोजी, मध्यप्रांत वऱ्हाड या प्रातांचे कॉग्रेस अधिवेशन नागपूर येथे आयोजित करण्यात आले. इथे एक गोष्ट लक्षात ठेवावयास हवी ती हे फक्त विदर्भाचे अधिवेशन नव्हते. यावेळी विदर्भ अस्त्विात आला नव्हता. तर विदर्भ नाग प्रदेशाचा भाग होता. हे मध्यप्रांत व वऱ्हाड चे अधिवेशन होते. व या प्रांताचा विस्तार नाग प्रदेशा व्यतिरिक्त थेट रायपूर, विलासपुर, (छत्तीसगड) पर्यत होता. पुढे इ स १८१० मध्ये अलहाबाद कॉग्रेस अधिवेशनात वऱ्हाडला वेगळे प्राताचे स्थान प्राप्त झाले. १५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर मराठी भाषिकांचे राज्य म्हणुन राज्याच्या निर्मितीच्या वेळी पुणे, मुंबई, मराठवाडा, वऱ्हाड प्रांत हे प्रदेश एकत्र आलेत. त्यावेळी मुंबई स्वतंत्र राज्य होते. मराठवाडा विभाग हा हैद्राबाद निजामशाहीतुन महाराष्ट्रात आला. वऱ्हाड प्रांत मध्यप्रदेशातुन (तत्कालीन)

सि. पी. ॲन्ड बेरार मधुन महाराष्ट्रात आला. आपला देश पारतंत्र्यात असतानाही महाराष्ट्र एकीकरणाच्या चळवळीस सूरूवात झाली होती. वर्धा येथे भरलेली कार्यकत्याची परिषद 'वऱ्हाड' राज्यासाठी असली तरी महाराष्ट्रात एकीकरणाच्या चळवळीस वेळोवेळी सहाय्य करणे हे त्यात विहीत होते. इ. स. १९४३ च्या ऑक्टोबरमधील अमरावतीची महाराष्ट्र एकीकरण परिषद ही त्याच प्रकारची होती. ८ऑगस्ट १९४६ ला अकोला येथे प्रसिध्द झालेला 'अकोला करार' हा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या पाठिंब्याचा करार होता. १२ ऑगस्ट १९५१ ला खामगाव व अमरावती या दोन्ही ठीकाणी 'डाग' दीन आयोजीत केला होता. माधवराव बागलच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परीषदेचे उदघाटक होते. सेनापती बापट, शिवाजीराव पटवर्धन, बाबासाहेब खापर्डे, मराठे त्यात होते सयुक्त महाराष्ट्रात राहण्याचा त्यात निर्धार केला होता. २८ डिसेंबर १९५३ रोजी वऱ्हाड प्रांताचा संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ठ ऐतिहासिक अकरा कलमी, 'नागपूर करार' केला गेला. वऱ्हाड प्रांत गमवायचा नाही व मुंबई सोडायची नाही हे धोरण तत्कालीन वैदर्भीय नतृत्व रा. कृ. पाटील, रामराव देशमुख, शंकरराव देव यांनी स्विकारले होते. ६ फेब्रु १९५६ ला. पं. नेहरु व विनोबा भावे यांची तीन तास चर्चा झाली. विनोबाचा आश्रम विदर्भातल्या पवनारचा विनोबांनी नेहरुंना सांगितले होते की मराठी माणूस म्हणून बोललो तर मुंबईवर अवश्य हक्क सांगेन.[८]

मराठी भाषीक लोकांचे एक राज्य होण्यासाठी महाराष्ट्राचा निर्मितीच्या संकल्पनेचा पाया ज्या ठरावाने घातला गेला तो ब्रिटीशकालीन वऱ्हाड मध्यप्रांताचे व्दिभाषिक मोडून सर्व सलग मराठी भागाचे विदर्भ नावाचे एकभाषी राज्य स्थापन करण्याचा ठराव विदर्भातील प्रांतीय विधानसभेने १ ऑक्टो. १९३८ रोजी सर्वप्रथम संमत केला. विदर्भाच्याच ग. दय. माडखोलकरांनी बेळगावच्या मराठी साहित्य संमेलनात पुढे संयुक्त महाराष्ट्रात ठराव मांडून समितीची स्थापना १२ मे १९४६ रोजी तेथेच केली. संयुक्त महाराष्ट्राचा जी चळवळ १९५५ सालच्या अंतापासून विलक्षण झंझावाती वेगाने फोफावत गेली आणि इ. स. १९६० साली विजयी झाली तिचा पाया इं.स. १९३८ च्या साल अखेर वऱ्हाडात घातला गेला. असे महाराष्ट्राचे महामंथन हा ग्रंथ लिहिणारे लालजी पेंडसे म्हणतात.[९]

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी यशवंतराव चव्हाणांनी वऱ्हाड प्रांतात दिलेली आश्वासने त्यांच्या वारसदारांनी नंतरच्या काळात फारशी पूर्ण केल्याचे दिसले नाही. १ मे १९५६ या दिवशी व्दिभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाली. त्यानंतर झालेल्या १९५६ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबई महाराष्ट्रासह मराठवाड्यात आणि महागुजरात समितीने गुजरातमध्ये कॉग्रेसचे ६२ पैकी ५४ आमदार निवडून आले होते. त्यांचा पाठिंबा मिळणार असेल तरच मुंबई राज्याचे यशवंतराव चव्हाण सरकार टिकणार होते. विदर्भ राज्याच्या मागणीसाठी वऱ्हाड प्रांतातील सर्व आमदारांनी त्यांचे राजीनामे तेव्हाचे त्यांचे नेते कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांच्या स्वाधीन केले होते. त्या स्थितीत वेगळा विदर्भ की कॉग्रेसनिष्टाअसे पर्याय समोर असलेल्या कन्नमवारांना प्रत्यक्ष प. नेहरुंनी गळ घातल्यामुळे ते विदर्भाची मागणी सोडून संयुक्त महाराष्ट्रात निर्माण व्हायला मदत झाली.[१०]

पूर्व विदर्भातील म्हणजे झाडीपट्टीतील नागपूर, वर्धा, चंद्रपुर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया तसेच पश्चिम विदर्भातील म्हणजे वऱ्हाडातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा, वाशिम यांचा मिळून विदर्भाचे वेगळे राज्य व्हावे ही प्रत्यक्ष पं. नेहरु, सरदार पटेल आणि पट्टमी सितारामय्या यांची इच्छा होती. हे तिघे ज्या भाषावार प्रांत रचना समितीचे सदस्य होते. त्या समितीने वेगळ्या विदर्भाच्या निर्मितीची सुचना आपल्या अहवालात केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही वेगळ्या विदर्भाला मानयता होती. शिवाय लोकनायक बापुची अणे या थोर देशभक्ताच्या नेतृत्वात वेगळ्या विदर्भाचे आंदोलनही तेव्हा सुरु होते. बापुजी अण्यांनी फाजल अली कमिशनसमोर विदर्भाच्या स्वतंत्र राज्याची कैफियत मांडतांना विदर्भासाठी वापरलेला शब्द आदि महाराष्ट्र हा आहे. असे म्हटले. अशा स्थितीत विदर्भाचा प्रदेश महाराष्ट्र राज्यात विना अट सामील होणे अशक्य होते. त्यावेळी झालेले अनेक करार ही त्या अटीचीच परिणती आहे. कन्नमवार हे स्वातंत्र्य लढ्यातुन आलेले नेते होते. दुर्देवाने त्यांच्या पश्चात जनतेच्या पांठिब्यावर उभे झालेले दुसरे नेतृत्व विदर्भात आले नाही. वैदर्भीय राजकारणाच्या या दुबळेपणाचा फायदा घेत प्रथम नागपूर कराराला आणि पुढे विदर्भाच्या रास्त मागण्यांना हरताळ फासल्या गेल्याने साऱ्याच्या अनुभवाला आले.[११]

पूर्व विदर्भ- पश्चिम विदर्भ मिळून विदर्भाची निर्मिती झाली. इ.स. १९६० मध्ये विदर्भ महाराष्ट्रात विलिन झाला. परंतु १९५३ मध्ये केंद्र शासनाने स्थापन केलेल्या राज्य पुनर्रचना आयोगाने आपल्या अहवालात स्वतंत्र विदर्भ राज्याच्या स्थापनेची शिफारस केली, परंतु राजकीय कारणामुळे वेगळ्या विदर्भाचे राज्य न करता १६५६ मध्ये देशाच्या घटने मध्ये संशोधन करुन ३७१ (३) हे कलम समाविष्ट करण्यात आले व त्यात महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे विधेयक विधिमंडळात स्थापना करतांना स्टेटमेंट ऑफ गव्हर्नमेंट पॉलिसी म्हणजेच महाराष्ट्र राज्यात भविष्यात विदर्भाला कशी वागणूक मिळेल याचा वचननामा विधिमंडळात सादर केला. महाराष्ट्रात राज्याच्या विदर्भासह विविध विभागाचा समतोल विकास होईल असे आश्वासन देण्यता आले. परंतु, प्रत्यक्षात या आश्वासनाची म्हणावी तशी पुर्ती न झाल्याने १९८० पासून विधी मंडळात विदर्भाच्या मागासलेपणाची चर्चा सुरु झाली. शेवटी १९८२ मध्ये विभागीय असमतोल दुर करण्यासाठी डॉ. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समितीचा स्थापना झाली. या समितीच्या अहवालाप्रमाणे विदर्भाचा मागासलेपणा समोर आला व १९६० मध्ये महाराष्ट्रात विदर्भाचे विलीनीकरण करतांना विदर्भाला भविष्यात मिळण्याच्या न्याय वागणुकीचे धोरण राबविले पाहिजे हे स्पष्ट झाले.[१२]

## संदर्भ ग्रंथ सूची


१) केतकर, श्रीधर व्यंकटेश :- महाराष्ट्रीय ज्ञानकोष (शरीरखंड भाग १९) पुणे-१ १९,३६, पृ. क्र. ११२

२) महाजन द. भा. : ‘अचलपूर इतिहासाचा मागोवा’ तरुण भारत, ६ फेब्रु १९७६

३) मिराशी, वा.वी: संशोधन मुकतावली तिसरा, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर १५८, पृ. क्र ६२

४) वक्कानी, नि. आ.: आधुनिक विदर्भा का इतिहास, नागपूर, १९८५, पृ क्र.२

५) काळे, या . मा. :नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, व्दितीय आवृत्ती, महाराष्ट्र शासन, प्रकाशन नागपूर. दि. १ जाने. १९८९, पृ क्र. ३८

६) गोळे, पु. ब.: मातृभूमी विशेषकामधील समालोचनात्मक लेख, विदर्भाचा घटना विकास, दिनांक ९ ऑगस्ट १९४६, पृ. क्र. ११

७) व्दादशिकर, सुरेशः ‘वचना, उपेक्षा आणि अपेक्षा’लोकराज्यातला लेख- डिसेबंर २०११

८) जोशी, श्रीपाद भालचंद्र : ‘सांस्कृतिक अनुशेषाची संकल्पना’लोकराज्यातला लेख, डिसेंबर २०१२

9) धनगर, प्राचार्य मदन :‘विदर्भातील ज्ञानपिठे’, लोकराज्यातला लेख डिसेंबर २०१३

१०) किंमतकर , ॲड. मधुकर : अनुशेषाची सद्यास्थिती, लोकराज्यातला लेख डिसेंबर २०१४

११) देसाई हेमंत : विदर्भाच्या नेतृत्वखुना, लोकराज्यातला लेख डिसेंबर २०१५

१२) कित्ता